# राशिभविष्य - फेब्रुवारी , २०१४.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==========================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होणे संभवते. पण आर्थिक बाबतीत मात्र चिंता निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. कुमार्गी मित्रांपासून दूर राहा. नपेक्षा आर्थिक नुकसान सहन करावे लागून स्वत:च्या प्रतिमेला धक्का बसू शकेल. जपा. हितशत्रूपासून सावध राहा. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने परिस्थिति नियंत्रणात राहू शकेल. गुरुकृपेने व सज्जनांच्या सहवासाने मन स्वस्थ व शांत राहू शकेल. प्रवासाचे योग संभवतात. काही मंडळीना अपप्रचाराचा त्रास होण्याची शक्यता जाणवते; तर काहीना भावंडाकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. वैवाहिक जीवनात स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे, दोघांतील मतभेदामुळे वा अन्य कारणाने सुख समाधान मिळण्याची शक्यता दिसत नाही. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल तर गैरसमजाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्या. तसेच कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकला. वाममार्गे धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होईल. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या अत्यंत लहरी झाला असण्याची शक्यता दिसते. त्यामुळे विशेष करून या महिन्याच्या पूर्वार्धात उगीचच स्वत:लाच मनस्ताप करून घ्याल असे वाटते. महिन्याच्या प्रथम सप्ताहात संततिसमस्यांमुळे त्रस्त व्हाल. मुलांपैकी कोणाचे अयोग्य आचरण, कोणाचे

आजारपण, अशापैकी समस्यांमुळे त्रस्त व्हाल. तसेच स्वत:च्या सर्व प्रकारच्या आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घेणे जरूरीचे होईल. चोरीमुळे, किंवा अन्य कारणाने अर्थहानी होणे संभवते. काही मंडळीना अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागेल. नोकरी-व्यवसायात महिन्याचा पूर्वार्ध मनस्ताप देणारा असल्याचा अनुभव येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती अनुकुल होईल. मानसिक रोगतजन्य, द्रव पदार्थाचे व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण इतर व्यापार-व्यवसाय असणारांनामात्र अस्वस्थ परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे अधिक अर्थलाभ होण्याची शक्यता वाटते. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. केवळ गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने संशोधन व बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. मंगळ ग्रहाच्या प्रतिकुलतेमुळे या महिन्याच्या प्रथम सप्ताहात कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात व नंतरच्या काळात संततिसुखात बाधा येणे संभवते. मुलांपैकी कोणाचे अयोग्य आचरण, कोणाचे आजारपण अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. नोकरदार मंडळींना वरिष्ठाकडून त्रास सहन करावा लागणे संभवते. मात्र कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनात चिंतेचे वातावरण निर्माण होणे संभवते. कुसंगतीच्या बाधेमुळे धन नाश

होणे संभवते. जपा. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. रवि ग्रहपूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे घरीदारी सर्व ठिकाणी मनस्ताप सहन करावा लागेल व त्यामुळेच अनारोग्य होणे संभवते. श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क** - या राशीच्या मंडळीनी सध्या आहे ती नोकरी किंवा व्यवसायच मनापासून व्यवस्थित करावा असे मुद्दाम सांगावेसे वाटते. नवीन काही करण्याचा विचारही करू नये. मंगळ ग्रहामुळे तशी उर्मी येईल; पण मन आवरा. या राशीच्या चतुर्थ स्थानी शनि-मंगळ-राहूअसल्यामुळे कौटुंबिक सुख व गृह सौख्य यात विविध कारणांनी बाधा येणे शक्य आहे. गैरसमज, कौटुंबिक भांडणे, तंटे, स्थावरसंबंधी वाद, राहत्या जागेची समस्या, कुटुंबात घडणाऱ्या अनिष्ट घटना अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळेच शारीरिकअनारोग्य होणेही शक्य आहे. ताप येणे, अपचन होणे, पोटविकार बळावणे असे आजार होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत वरिष्ठांचात्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. भाग्यस्थानी असलेल्या हर्षलमुळे गूढ व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. काही मंडळींना परदेशप्रवासाचे योग संभवतात. समाजकार्यात तसेच अध्यात्मात रस असणारांना प्रगती होत असल्याचा अनुभव येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(५) सिंह** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होणे संभवते. म्हणून त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या प्रथम सप्ताहातच केवळ अनारोग्याचा व आर्थिक चिंतेचा थोडा त्रास होईलसे दिसते. यांत्रिक -

तांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते , लोखंडी सामान व कोळसा विक्रेते , वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारे, अकौन्टनसी असे चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. भावंडविषयक चिंताही त्रस्त करील. कौटुंबिक सुख समाधान लाभेल ; पण महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच वाद, भांडणे, जीवनासाथीचे अनारोग्य अशापैकी कारणांनी दाम्पत्यजीवनातही सुख समाधान मिळणे कठीण दिसते. सदैव सावधानतेने आचरण करा. वाहने जपून चालवा. अपघातभय आहे. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. विवाहेच्छू वधूवरांचे विवाह ठरतील. नवे मित्र मिळतील. गायत्री उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या प्रथम सप्ताहात हट्टी स्वभावामुळे व मानापमानाच्या विचित्र कल्पनांमुळे अकारण मनस्ताप करून घ्याल. त्यामुळेच नंतरच्या काळात शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकारांचा त्रास सहन करावा लागेल. जपा. कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे, आर्थिक समस्या अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. जपा. पण गुरू-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व प्रतिकूल काळ सुसह्य होईल. या राशीच्या नवयुवकांना नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल; तर बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना मानसन्मानाचे योग येतीलसे दिसते. शेतीवाडी असणारांना त्यापासून अधिक लाभ होणे संभवते. महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत त्रास सहन करावा लागण्याची शक्यता वाटते. शिवाय संततिसमस्या, प्रिय जनांचा दुरावा, अनारोग्य अशापैकी कारणानी मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. पण महिन्याच्या उत्तरार्धात

परिस्थिती सुधारेल. हर्षलमुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे शक्य आहे. जपा. श्रद्धेनेहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना, आर्थिक समस्या, विरोध, भांडणे यांमुळे त्रस्त व्हाल. त्यामुळेच शारीरिक अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. स्वभाव हटटी, हेकट, मानापमान फार असा होणे संभवते. त्यामुळे अकारण दगदग, शरीरपीडा होणे संभवते. काही मंडळीना उष्णताविकाराचातर काहीना वातविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. नोकरी व्यवसायात प्रतिकुलपरिस्थिती , कौटुंबिक त्रास , संतति समस्या, अति विचार यांमुळे डोकेदुखी किंवा मेंदु विकाराचा त्रास सहन करावा लागेल. जपा. मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असेल तर अध्यात्मिक उपासनेद्वारे मन स्वस्थ व शांत राहू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक जीवनात सुख समाधान लाभेल. काही मंडळीना धनलाभ, काहीना भूमिलाभ, काहीना मानाचे स्थान किंवा प्रतिष्ठा प्राप्त होण्याची शक्यताही दिसते. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे गुणांचा विकास होण्यास संधी प्राप्त होईल व उत्कर्षाकडे वाटचाल सुरू होईल. प्रवासाचे योग येतील. श्रद्धेने हनुमान उपासना करा व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या व्ययस्थानी शनी-मंगळ-राहू असल्याने या राशीच्या मंडळीनी काळ प्रतिकुल असल्याची जाणीव ठेवूनच सहनशील बनावे व संयमशील आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. अशा परिस्थितीत नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल वा लाभदायक होईल. शुक्राच्या अनुकुलतेने महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुख समाधान लाभेल; धनलाभ होईल, पण महिन्याच्या उत्तरार्धात मात्र कुटुंबात विविध कारणांनी

त्रास , भांडणे , मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या कलात्मक अभ्यासक्रम शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना व कलात्मक व्यवसाय, शास्त्रीय संशोधन क्षेत्र , चिकित्सक उच्च बौद्धिक व्यवसाय असणारांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहीना असा अचानक धनलाभ वा वारसा हक्कानेधनलाभ होणे संभवते. काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळू शकेल. असे असले तरी वर सांगितल्याप्रमाणे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडून गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. श्रद्धेने श्रीगजाननउपासना व श्रीहनुमानउपासना करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या प्रथम सप्ताहात नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांशी मतभेद, व्यापार-व्यवसायात अडचणी, खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. कष्ट परिश्रमानेच अर्थप्राप्तीहोईल . मित्रांशी काहीही कारणाने वितुष्ट येणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायास काळ अनुकुल वा लाभदायक होईल. वरिष्ठ कौतुक करतील. आरोग्य सुधारेल. अध्यात्म , गूढ संशोधन अशी कार्य क्षेत्रेअसणारांना काळ प्रगतिकारक होईल. या राशीच्या काही मंडळीना जल प्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील. पण विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे शक्य दिसते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अनारोग्य किंवा अन्य कारणांनी अडथळे येण्याची शक्यता जाणवते. या राशीच्या काही मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतीना विवाहयोग येऊ शकेल. प्रेमसं बंध असतील तर ते घट्ट होतील. नवे स्नेहसंबंध जुळतील. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकूल होईल. बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच नम्रतेचे ेआचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच हाती घेतलेल्या कामात अडचणी, अडथळे निर्माण होणे, गैरसमजाने वाद, भांडणे होऊन कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. शिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. जपा. त्यामुळेच अनारोग्य होणेही शक्य आहे. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर विशेष काळजी घेणे आवश्यक होईल पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने वकिली, सल्लागारी व्यवसाय, उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. इतरांच्या व्यापार - व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. पण प्रवासात त्रास होण्याची शक्यता आहे. जपा. शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व प्रतिकुल काळ काही प्र माणात सुसह्य होईल. श्रद्धाअसेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत भावनाशील झाले असेल तर मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत धनस्थानी असलेल्या हर्षलमुळे बुद्धीही अस्थिर होणे संभवते. त्यामुळे फटकळ बोलण्याने प्रिय जन दुखावले जातील जपा. जिभेला लगाम घाला. विविधकारणांनी कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळण्यात बाधा येणे शक्य आहे. मन व बुद्धी शांत व स्थिर राखण्यासाठी या राशीच्या मंडळीनी थोडे अध्यात्माकडे वळावे, असे सांगावेसे वाटते. गुरु-शुक्राच्या अनुकूलतेमुळे या राशीच्या कोणत्याही शाखेचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक

प्रगतीच्या  दृष्टीने काळ अनुकुल होईल. प्रेमसंबंध  दृढ होतील. तसेच साहित्य , काव्य अन्य कलागुण असणाऱ्या गुणी जणांना नव निर्मितीस  काळ अनुकुल होईल व त्यातून अर्थलाभ  होणेही शक्य दिसते. महिन्याच्या प्रथम  सप्ताहात अनारोग्य  व अपघातभय आहे. जपा. राहूमुळे कौटुंबिक सुखात व गृह सौख्यात बाधा येऊ शकेल. जपा. पण शुक्रामुळे  मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व काळ सुसह्य होईल. .कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

**(१२) मीन -** तुलनात्मक दृष्ट्या या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वा र्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. नोकरी-व्यवसाय कोणताही असो, महिन्याच्या पूर्वार्धातच  या राशीच्या मंडळीनी जे काय साधावयाचे ते साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न  करावा. गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना काळ अधिक अनुकुल होईल. पण सतत मनस्ताप देणाऱ्या घटनांनी नैराश्य आले असेल तर स्वभाव अधिक चिडचिडा, चंचल, लहरी, अस्थिर असा घडत असला पाहिजे. अशा परिस्थितीत मनावर ताबा ठेवून व सहनशील बनूनच प्र तिकूल काळाशी मुकाबला केला पाहिजे. शनी-मंगळ-राहू हे तीनही ग्रह  प्रतिकुलअसल्याने शारीरिक मानसिक कष्ट , दगदग सहन करावी लागेलसे दिसते शिवाय अनारोग्य , अपेक्षाभंग  यांमुळे व दाम्पत्यजीवनातील  वाद, गैरसमज यांमुळे किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखसमाधानात बाधा येणे संभवते.  सतत सावधानतेने आचरण करा. अपघात भय आहे. जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण जवळच्या नात्यातील मंडळीचा त्रासही  होणे संभवते.  नियमितपणे बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण  करा.

========ooooo=========